Club No. 26272

RI District 3131

Rotary

Issue No. 6 : December 2024


# PRATIMA

**Bulletin of Rotary Club of Pune Kothrud**

**President**
Rtn. Manish Didmishe

**Editor**
Ann Rekha Pandit

**Hon. Secretary**
Rtn. Rahul Khandekar



**Meetings:**
Every Tuesday, 7 pm - 8:30 pm
Damle Hall, Law College Road, Pune

**Contact us:**
rotarykothrud@gmail.com
http:\\rcpunekothrud.rotary3131.org

# PRESIDENT'S MESSAGE



Dear Rotarians and Partners,

Greetings!

Our November month commenced with a truly remarkable experience, as we attended the Marathi play 'स्थळ आले धावून'. , which featured famous artists such as Dr.Girish Oak, Sanjay Mone, and Poornima Talwalkar. The performance was nothing short of spectacular, captivating the audience with its depth and artistry. The event was a big success with a large number of club members in attendance, further testament to the play's appeal and the quality of the production. Compliments to the program committee for their continued efforts in curating such a diverse and engaging range of events and ensuring the sustained excitement and enthusiasm of our members.

The program on Narmada Parikrama, presented by Shri Sadashiv Gangadhar Joshi, was an exceptionally informative session that provided valuable insights into the preparations and physical fitness necessary to undertake such a challenging journey. Shri Joshi, a National Kabaddi player, shared his personal experience of completing the entire journey on foot over the span of four months. His detailed account, along with his expert guidance, proved to be highly beneficial for anyone contemplating the undertaking of this spiritual and physically demanding journey. His firsthand knowledge and wisdom were both enlightening and practical, offering a comprehensive understanding of what it takes to successfully complete the Narmada Parikrama.

The preparations for the upcoming year 2025-26 have commenced with the election of the Nomination Committee, which will be responsible for selecting the President for the year 2027-28, as well as the Board members for the subsequent term. The election process was conducted in accordance with Rotary's established norms, under the able leadership of Past President Ravi Pandit, alongside Past Presidents Prashant Siddha and Vasant Kulkarni. The members of the Nomination Committee were chosen through a voting process carried out by the club members. This esteemed committee will now undertake the important task of selecting the President for 2027-28 and the Board members for the next year. We extend our heartiest congratulations to all the members of the Nomination Committee who have been elected.

The program हितगुज कोड्यांशी संवाद शब्दांशी, presented by Ms. Shama Erande, Dr. Nilima Radkar, and Adv. Manjiri Karve, was a truly unique and enriching experience. The three sisters have been diligently working to promote awareness of the Marathi language and restore its linguistic pride through an engaging and entertaining approach. Their method, which included word puzzles, riddles, songs, and games in Marathi, was both captivating and educational. Their remarkable efforts in preserving and celebrating the Marathi language not only left a lasting impact but also evoked a sense of nostalgia, transporting us back to our younger days. We commend their dedication and creativity in making the language both accessible and enjoyable.

In summary, the month of November proved to be an excellent blend of engaging programs, exceptional fellowship, and enthusiastic participation from our club members. As we look ahead to December, we eagerly anticipate another enriching array of programs, projects, and activities. With the halfway point of this year fast approaching, we are confident that the coming months will continue to foster our collective spirit and commitment to excellence.

Best regards,

**Rtn. Manish Didmishe**
**President 2024-25**

# Editorial



My dear Rotarians & Partners, Time flies; they say. It indeed flies. While I was enjoying my interaction with you all in my new role as the Editor of Pratima, I suddenly realized that we will be completing half of the Rotary year 2024-25 this month. On my part I am thoroughly enjoying this exciting, happening and eventful year shaping up well under the leadership of our beloved President, Rtn. Manish. This month will mark the end of the calendar year 2024 and we all will look forward to 2025 with new hopes for another wonderful year.

**Partner, Rekha Pandit,**
Editor, Pratima.

# Director Corner

'Disease prevention and treatment are fundamental to maintaining good health and well-being.

Prevention involves a proactive approach to reduce the risk of illness before it occurs. It includes practices such as regular physical activity, balanced nutrition, stress management, and adequate sleep, all of which strengthen the immune system and promote overall health.

Vaccination is a key preventive measure, helping to protect individuals and communities from infectious diseases. Additionally, avoiding harmful behaviors such as smoking, excessive alcohol consumption, and unsafe sexual practices can significantly lower the risk of chronic diseases like cancer, heart disease, and respiratory conditions.

Treatment, on the other hand, focuses on addressing health issues once they arise. It can involve a variety of methods depending on the nature and severity of the disease, including medication, surgery, physical therapy, and lifestyle adjustments. Early diagnosis and timely intervention are crucial in managing conditions effectively and preventing complications. In recent years, advancements in medical technology and research have led to more effective treatments for both acute and chronic diseases, improving patient outcomes.

Ultimately, a combination of prevention and timely treatment is the most effective approach to ensuring long-term health, reducing healthcare costs, and enhancing the quality of life.

**Rtn. Sushma Kulkarni**

# सॅनिटरी नॅपकीन तयार करण्याचे प्रशिक्षण

आज एरंडवणे माध्यमिक शाळेत आयोजित सॅनिटरी नॅपकीन तयार करण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. सकाळी ८.३० ला कार्यक्रम सुरू झाला. ६० मुलींनी सहभाग घेऊन प्रशिक्षण घेतले. सेवासहयोगच्या मार्गदर्शकांनी प्रात्यक्षिकासह प्रशिक्षण दिले. तसेच काही डी.एड.च्या मुलींनी पण प्रशिक्षण घेतले. त्यांना फार उपयुक्त वाटले. चेयरमन रो.ऊर्मिला रो.प्रोजेक्ट डायरेक्टर सुषमा कुलकर्णी फर्स्ट लेडी मनिषा निलिमा यांनी कार्यक्रम छान केला. वसुधा आणि अमृता उपस्थित होत्या. तसेच सेवासहयोगच्या दीप्तीताई पण आल्या होत्या.







# Travelog

## Samarkand : The crossroads of cultures.



From the 8th century BC till date Samarkand is a city that has been occupied by a variety of people, cultures and mentalities. It is the oldest continuously inhabited city of Central Asia ruled conquered ,destroyed and reconstructed by many. The Turks, the Arabs, the Mongols then the Russian federation followed by the USSR. ..and finally the Uzbeks.

The city is at the crossroads ...of the silk road and also the road that joins it from India. So naturally it was a very big cultural and commercial meeting point. The Timurid dynasty ruled here in 14th 15th centuries starting with Timur called Amir and his grandson Ulugbek who was also an astronomer .

Madarsaas which are educational institutes and mosques along with mouseliums were built in this period and this has resulted in the place being recognized as a world heritage site. Some of the finest monuments of central Asian culture can be seen in Samarkand... the word itself means Rock fort fort or a rock town.

We traveled by a meter gauge high speed train from Tashkant to Samarkand to see this beautiful place.

It's now a modern town depicting the Russian influence( as the beautiful modern railway station)on buildings and the city is dotted with many historical and cultural sites...

*The tomb of Timur known as Gur-e-Amir,the Shah I Zinda





the mouselium complex,
*The Registan..
*The observatory of Ulugbek ,
*The Bibi Khanum mosque
(For his favorite Chinese wife Timur built a mosque .)
and many more...parks,spice bazzars university building and others.

The structures are very well preserved. There is absolutely no damage as we see in India.

Timur was a cruel barbaric ruler who looted and destroyed other countries and used its wealth to build beautiful monuments in his own country. I could sense the stink of blood of the innocent killed to build these monuments, but then that's how the world is.

Today the people though are quite friendly and nice.

In all the buildings there are huge columns, large exterior domes coated with decorations, mosaic, marble and gold.. mejolica which is the ceramic tile aspect is also used in the interior of many places. The beauty of all these majestic buildings is really fascinating. Old photos show that Registan is really what we think it is ...a desert , but today its a very big paved complex of three madarsas or educational institutes that have been standing for at least

500 years. The observatory depicts places from where Ulugbek got his knowledge and that includes India too. I'll leave you to enjoy the photos.

**P.P. Rtn. Prakash Jog**













# त्याचं असं झालं

लेखक – डॉ. श्रीनिवास नाटेकर, प्रकाशन – चतुरंग

* **त्याचं असं झालं,**

मी एकदा दुपारी सांगली मधील क्लिनिकमध्ये बसलो होतो, मला मिरज येथील प्रसिद्ध कान नाक घसा तज्ञ डॉ. डी. के. गोसावी यांच्याकडून फक्त 'एक व्ही आय पी रुग्ण' येणार आहे, इतकेच माहिती होते आणि त्या मागील दाराने आत येतील. बरोबर साडेतीन वाजता मागील दारात एक गाडी थांबली, गाडीतून पांढरीशुभ्र साडी नेसलेली एक शालीन, डोक्यावरून पदर घेतलेली, नम्र स्त्री उतरली, तिने तिच्या जगप्रसिद्ध खळाळत्या हास्यमय आवाजात सांगितले, 'नमस्कार डॉक्टर साहेब, माझ्याच छातीचा एक्स रे काढायचा आहे!' अंदाजे तासभर ती माझ्या क्लिनिक मध्ये होती. एकूण आठ एक्सरे मला काढायला लागले. त्या दरम्यान माझ्या गाण्याच्या आवडीमुळे आमच्या गप्पा चांगल्या रंगल्या, इतक्या कि 'सैंया' चित्रपटातील 'काली काली रात रे, बड़ा सताये, तेरी याद में..' हे गाणे आठवून आम्ही दोघांनी मिळून एकसुरात गुणगुणलो! ती होती गान कोकिळा, स्वरशारदा 'लता मंगेशकर !

* **त्याचं असं झालं,**

दुपारी डॉ. डी. के. गोसावी यांचा फोन आला, त्यांच्या मिरज येथील फार्म हाऊस वर गप्पा मारायला संध्याकाळी बोलावले होते. मी वेळेवर गेलो, टेबलावर स्कॉच आणि तीन ग्लास ठेवलेले होते, एक अस्ताव्यस्त केस वाढवलेला गोरापान लहान चणीचा माणूस बसला होता. डॉक्टरांनी ओळख करून दिली, हे कविवर्य 'बा. भ. बोरकर!'

* **त्याचं असं झालं,**

ती व्यक्ती दोन वेळा माझ्या घरी राहिली होती, तोंडात पान सतत असल्यामुळे ओठाचा चंबू, चणीने लहान, बुटके, गोल चेहरा, गोबरे गाल. त्यांचा छातीचा एक्सरे मी बघितला आणि म्हटले, 'एक फुफ्फुस अर्ध्यापेक्षा जास्त निकामी, दुसरे देखील हवेचे फुगे झाल्यामुळे (एम्फिझिमा) लवकरच कामातून बाद होणार! तरिही ते गात होते, तासंतास! त्यांचे नाव पंडित कुमार गंधर्व !

* **त्याचं असं झालं,**

मिरज रेल्वे स्टेशनवर मित्राला सोडायला गेलो होतो, खूप गर्दीमध्ये पाठीवर थाप पडली, मागे वळून बघितले तर दोन मित्र होते, त्यांना मुंबईला जायचे होते. इथे रेल्वे बदलावी लागायची, महालक्ष्मी एक्सप्रेसमध्ये त्यांना जागा मिळत नव्हती. रिझर्वेशन केले नव्हते, अगदी काकुळतीला येऊन त्यांनी मदतीसाठी विचारले. त्याचवेळी माझा मित्र असलेला आमदार विक्रम घाटगे भेटला, त्याने दोन बर्थ मिळवून दिले, त्या दोघांपैकी एक होता माझा खास मित्र मुकुंद जोशी आणि दुसरा होता आमचा मित्र 'सुनील गावस्कर!'

* **त्याचं असं झालं',**

एकदा सांगली सिव्हील हॉस्पिटलसाठी एक्सरे मशीन खरेदी करण्यासाठी मुंबईमध्ये गेलो होतो, कामे आटोपून सचिवालयाजवळ फिरत असताना समोर स्टेट बँकेची इमारत होती, नुकताच आपल्या क्रिकेट टीमने इंग्लंडमध्ये जाऊन त्यांच्यावर विजय मिळविला होता. सहज म्हणून वर गेलो. केबिनबाहेरील सेक्रेटरीकडे 'ओल्ड फ्रेंड' म्हटले आणि स्वतःचे नाव न लिहिता चिठ्ठी दिली, आतून ती व्यक्ती स्वतः बाहेर आली, दार उघडल्याक्षणी मला मिठी मारून विचारले, 'काय श्री, काय म्हणतोस?' ती व्यक्ती होती, भारताचा यशस्वी कर्णधार 'अजित वाडेकर !'

* **त्याचं असं झालं,**

सांगलीच्या पोलीस सांस्कृतिक भवनाच्या हॉलमध्ये माडीवर व्हरांड्यात मोडकळीस आलेल्या दोन खुर्चा हाताने साफ करून दोन व्यक्ती बसल्या होत्या, एका पोलिसाने आणलेल्या मळकट किटलीमधून दोन कप चहाचे भरले, ते कप देखील कळकट आणि टवके उडालेले होते, चहा आणि बिस्कीट खात गप्पा मारत बसलेल्या त्या दोन व्यक्तिपैकी एक म्हणजे मी होतो, आणि दुसरी व्यक्ती होती भारताचे माजी पंतप्रधान चौधरी चरणसिंग!

* **त्याचं असं झालं,**

एकदा सकाळी माझे मित्र माधवराव आपटे यांचा फोन आला, लगेच विलिंग्डन क्लब वर ये, आम्ही तिघे आहोत, चौथा पार्टनर हवा आहे. मी गेलो. हातात रॅकेट, पायात महागडे बूट घालून माझी वाट पाहणारे ते होते प्रसिद्ध उद्योगपती श्री आदित्य बिर्ला !

* **त्याचं असं झालं,**

सांगलीमध्ये एकदा १९९४ साली प्रभाताई कुलकर्णी यांच्या एका कारखान्याचा उद्घाटन समारंभ होता. सूत्रसंचालन मी करणार होतो, माझ्या इंग्रजी संभाषण कलेमुळे कारखाना दाखवण्याची जबाबदारी देखील माझीच होती. पाहणे आले. समारंभ छान पार पडला, शेवटी पाहुण्यांनी माझी ओळख झाल्यावर एकाच वाक्य म्हटले, 'नेव्हर इमार्जिन्ड यु आर अ मेडिकल डॉक्टर!' ती व्यक्ती होती, श्री रतन टाटा!

* **त्याचं असं झालं,**

घरीच संध्याकाळी गप्पा रंगात आल्या होत्या, समोरची व्यक्ती सांगत होती, 'आमच्या वाटेला हिरॉईन कधी येत नाही, येतात त्या

मर्कटचेष्टा करणाऱ्या बारबाला, स्कॉच बाटलीमधील कोरा काळा कडू चहा आम्हाला प्यावा लागतो आणि झिंगावे लागते खोटे खोटे! आम्ही पडलो व्हिलन, आमच्या गोळीबारात कधी कुणी मारत नाही, उलट हिरोच्या प्रत्येक गोळीने मात्र एकेक मुडदा पडतो.' ती व्यक्ती होती सदाशिव अमरापूरकर!

* **त्याचं असं झालं,**

माझा मित्र डॉ. आडिगा याचा फोन आला, आज रात्री साडेसात वाजता घरी जेवायला यायचे आहे. मी सात वाजून सत्तावीस मिनिटांनी पोहोचलो. तिसऱ्या मजल्यावरील खोलीत तीन खुर्चा होत्या, टेबलावर 'जॉनी वॉकर होती, समोरच्या खुर्चीत एक वृद्ध सद्गृहस्थ बसले होते, गोरेपान, तुळतुळीत टक्कल, भुरभुरणारे किरकोळ पांढरे केस, सोनेरी काडीचा चष्मा, झब्बा आणि त्यावर असणारी सोनेरी बटणे. ते होते ओंकारप्रसाद उर्फ ओ पी नय्यर !

* **त्याचं असं झालं,**

घरी 'काका' आले होते, गप्पांना सुरुवात होणार, तितक्यात लेदर बॅगमध्ये हात घालता घालता काका म्हणाले, 'चला संध्येची वेळ झाली', मी म्हणले, 'काका तुम्ही माझ्या घरी आहात, तेंव्हा व्हिस्की माझी!' गप्पा रंगात येत असताना मध्येच काका ओरडून माझ्या बायकोला सांगतात, 'सुधाताई, आमचं अमृतप्राशन झालं ग, आला वाढ!' मला वाटले, काका स्वतःच्या कवितेतील अनुभूती आणि त्यांचा जन्म उलगडून सांगत होते, त्यावेळी त्या ग्लासमध्ये जे काही असते, ती दारू नसतीच, ते असते अमृतः आणि काका म्हणजे साक्षात 'कविवर्य 'मंगेश पाडगावकर!

* **त्याचं असं झालं,**

बंगल्याच्या दारात एक मर्सिडीज गाडी उभी होती, पांढरीशुभ्र लुंगी आणि नुकतीच अंघोळ केलेला उघडाबंब तुकतुकीत देह सांभाळत ती व्यक्ती मनापासून गाडी धूत आणि पुसत बसली होती. मीही त्यांच्याबरोबर हातात फडके घेतले आणि ती गाडी पुसायला लागलो. सकाळची वेळ, त्या वेळी दूरदर्शनवर रामायण मालिका सुरु होती. आमच्या घरात आणि आसपासच्या बंगल्यातदेखील त्याचा आवाज मोठा असल्यामुळे आमच्यापर्यंत येत होता. रविंद्र जैन यांचे संगीत रामायण मालिकेमध्ये भरपूर आहे. विविध प्रसंगात विविध रागांचा वापर केल्यामुळे मालिकेमध्ये रंगत आली आहे. तिकडे तो राग ऐकला कि गाडी धुता धुता इकडे ती व्यक्ती त्या रागांचे विस्तारण करून, विडंबन करत गंमतजंमत करून गात होती. तिकडे रामायण संपले, इकडे गाडी स्वच्छ धुवून झाली, मी ऐकत होतो आणि गाणारी व्यक्ती होती, पंडित भीमसेन जोशी !

* **त्याचं असं झालं,**

गप्पा रंगात आल्या होत्या, आम्ही तिघेजण होतो, समोरच्या व्यक्तीला मी म्हणले, 'अण्णा, आमच्या डॉक्टरी व्यवसायात आम्हाला देखील खुपसे रांगडे अनुभव येतात, पण फारच थोडी डॉक्टर मंडळी ते शब्दबद्ध करतात. असे का बरे?' अण्णा म्हणाले, आता मी गप्प बसतो, तुझ्याकडे आहे अशा अनुभवांचे गाठोडे, तू सांग तुझे अनुभवः पुढील तासभर मी बोलत होतो, अण्णा ऐकत होते, शांतपणे डोळे मिटून. त्या दोघांपैकी एक होता माझा नूमवी (ओउने) शाळेतील माझा जिगरी दोस्त गजानन सरपोतदार आणि दुसरे होते 'गजानन दिगंबर माडगुळकर अर्थात गदिमा!

* **त्याचं असं झालं',**

सांगलीमधील रक्तपेढीचा कार्यक्रम होता, त्यासाठी पाहणे गाडीने येताना प्रवासात गाडीमधील एसी चालू होता, काचा बंद होत्या, अचानक काळा धूर येऊ लागला आणि आतमधील सर्वजण गुदमरू लागले. कशीबशी गाडी येऊन सांगलीत पोहोचली, तोपर्यंत सर्वजण उलटी, चक्कर आणि डोकेदुखीने त्रस्त झाले होते. मी जातीने उपचारात लक्ष घातले, रक्तपेढीचा कार्यक्रम संध्याकाळी सुरु झाला, बोलताना पाहुणे उभे राहिले, 'खरे म्हणजे आम्ही स्वर्गाचे दार ठोठावले होते, दार उघडले नाही म्हणून परत आलो, रक्तदान करायच्या अगोदर देहदान करायची वेळ आली होती!' श्रोत्यांना ती एक शाब्दिक कोटी वाटली, पण मला ते कारण माहिती होते. ते पाहुणे होते अर्थातच, 'भाई उर्फ पु लं. देशपांडे!

* **त्याचं असं झालं',**

सांगलीमध्ये एक क्रिकेट मॅचसाठी महान क्रिकेटपटू आलेले होते. सकाळी रत्ना इंटरनॅशनल हॉटेलमधून फोन आला, मी गेलो, खोलीमध्ये तापाने फणफणलेला एक रुग्ण, त्याला तातडीने मुंबईला हलवायला पाहिजे होते. तत्काळ थेट (तत्कालीन) मुख्यमंत्री वसंतदादा पाटील ह्यांना फोन करून विचारले, कारण ते आणि त्यांचे विमान सांगलीमध्ये होते, त्याच विमानातून त्या रुग्णाची सोय मुंबईमध्ये जाण्यासाठी केली, तो रुग्ण होता साक्षात 'सुनील गावस्कर!'

* **त्याचं असं झालं',**

आम्ही दिल्लीला जाताना वाटेत भोपाळ स्टेशनवर थांबलो. स्टेशनवरील मध्यप्रदेश डेअरीच्या स्टॉलवर थंड दुधाची बाटली मिळते, ती आणायला मी उतरलो, समोर झब्बा, लेंगा उपरणे घातलेले एक गृहस्थ, मी ओळखले, पटकन नमस्कार केला. नंतर त्यांनी जे सांगितले त्यामुळे मी गहिवरलो. ते म्हणाले, 'कालच रामचा फोन आला होता, तुम्ही याच रेल्वेने दिल्लीला चालला आहात, माझी गाडी दुसऱ्या प्लॅटफॉर्मवरून थोड्या वेळाने निघणार आहे, म्हणून तुम्हाला भेटायला आणि हा मिठाईचा पुडा घेऊन आलो आहे!' अशी ती व्यक्ती होती पद्मविभूषण पंडित कुमार गंधर्व!

* **त्याचं असं झालं,**

एकदा गाडीने मुंबईहून सांगलीला जात असताना चहा, नाष्टासाठी साताऱ्यात हॉटेल रजताद्रीमध्ये न जाता शनिवार पेठेतील माझ्या मित्राच्या घरी गेलो. तो ओपीडीमध्ये होता, त्याने घरी शिरा-भजी-चहा करायला सांगितला आणि समोरच्या टेबलाखाली ठेवलेले चार-पाच एक्सरे काढले. प्रत्येक एक्सरे ठराविक दिवसांनी घेतलेला होता, मी एक्सरे तज्ञ असल्यामुळे त्याने मला दाखविले.

सर्व काळजीपूर्वक बघितल्यावर मी फुफ्फुसाचा कर्करोग असल्याचे निदान केले. तो टीबी नसून कर्करोग होता. स्वतः एम डी डॉक्टर असणारा तो मित्र म्हणाला, अगदी बरोबर, मलाही तेच वाटत आहे. तू कॅन्फर्म केलेस. चहा-नाष्टा झाल्यावर मी सहज म्हणालो, कुणाचे एक्सरे आहेत रे ते? त्यावर तो अतिशय शांतपणे म्हणाला, 'माझेच!' मी सुन्न ! काही दिवसांचा सोबती असणारा तो प्रथितयश फिजिशियन म्हणजे सातारा शहरातील आजच्या जीवनज्योत रुग्णालयाचे एक संस्थापक, कै. डॉ. बाबा श्रीखंडे !

* **त्याचं असं झालं...**

त्याचं असं झालं...

त्याचं असं झालं...

त्याचं असं झालं...

ही यादी 'त्याच्या' आयुष्यात न संपणारी आहे.

आपसुकच मनामध्ये प्रश्न येतो की त्याचं 'असं' कसं झालं? आणि...

* त्याचेच कसं झालं? हे रहस्य ओळखण्यासाठी आपण हे ' त्याचं असं झालं पुस्तक वाचले पाहिजे. हा लेखक आहे, सांगलीमधील प्रख्यात रेडिऑलॉजीस्ट आणि डॉ श्रीनिवास नाटेकर. पुस्तक वाचताना आपण विस्मयचकित होतो, कि, एखाद्याच्या कुंडलीमध्ये विधाता काय काय 'योगायोग' भरून ठेवतो ?

कधी ती व्यक्ती दीर्घायुषी असते तर कधी अल्पायुषी, जन्माच्या स्टेशनवर आपण मृत्यूचे तिकीट घेऊन चढलेलो असतो. आपले उतरायचे स्टेशन कुठे येणार, कधी येणार हे आपल्याला माहीत नसते, काळाची ही रेल्वेगाडी चालूच असते, एकाच गतीने जात असते. आपण त्यामध्ये नुसत बसून राहायचं की शेजारच्या सहप्रवाशांशी गप्पा मारायच्या किंवा आणि काय लेखन, कला, साहित्य, चित्र काढत बसायचं हे आपल आपण ठरवायचं असतं. ८५ वर्षाच्या या प्रवासामध्ये नाटेकर सराना वाटेत अनेक प्रवासी मित्रमैत्रिणी भेटले. काही वेळ भेटले, आपापल्या स्टेशनवर उतरून निघून गेले, पण त्यामध्ये होते ते प्रथितयश कवी, लेखक, हिंदीमराठी सिनेसंगीतातील गायक, संगीतकार, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे खेळाडू, प्रख्यात उद्योजक, लोकप्रिय राजकारणी, आणखी किती नावे सांगू? हि यादी न संपणारी !

हे केवळ नशीब आहे का ही केवळ नियती आहे का की योगायोग?

लेखक म्हणतो परमेश्वराची कृपा असावी, परंतु मला असं वाटतं की ही लेखकाची एक तपश्चर्या असावी, समोरच्या व्यक्तीला न दुखवता त्याच्या हृदयामध्ये स्थान मिळवण्याची हातोटी असावी, लेखकाची ती एक कला असावी.

या पुस्तकाचे हेच वैशिष्ट्य आहे की याला अनुक्रमणिका नसली तरी चालते कोणतेही पान केव्हाही उघडावं आणि वाचत बसावे वाचव असता हसावं, चकित व्हावं.

हे पुस्तक सध्या छापील स्वरुपात विक्रीस उपलब्ध नाही. परंतु किंडल किंवा ई बुक उपलब्ध आहे.

**Shared by PP Rtn Ravi Pandit**




| | |
|---|---|
| 2 | Vasantrao Kulkarni |
| 4 | Rajesh Bhate |
| 11 | Vishakha Wagh |
| 13 | Sushma Rasal |
| 16 | Vishwanath Lele |
| 22 | Shailesh Manohar |
| 23 | Sudha Kulkarni |
| 24 | Sumedha Bhosle |
| 26 | Milind Yalsangikar |
| 27 | Rajeev Ambekar |
| 27 | Bhakti Siddha |




| | |
|---|---|
| 1 | Shailesh-Archana Manohar |
| 3 | Prashant-Bhakti Siddha |
| 8 | Prakash-Nilima Apte |
| 10 | Vasu-Neeta Yadwad |
| 11 | Rama-Mandar Lele |
| 14 | Satya-Chandana Chitale |
| 14 | Prakash-Nandini Umrani |
| 17 | Guru-Lalita Joshi |
| 21 | Dabke Asutosh-Sayli |
| 25 | Dr. Gautam-Archana Amol |

**For Private Circulation Only**
**Editor :** Ann Rekha Pandit
**Bulletin Committee Member :**
Ann Neeta Yadwad, Rtn Prakash Jog, PP Rtn Vasant Kulkarni, Ann Chandana Chitale